3

22562

कायम विनाअनुदान तत्वावर

जा.क्र.उमाशि-१/पुवि/नविनवर्ग मान्यता आदेश/२००३-०४
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,पुणे-१,यांचे कार्यालय
दिनांक :- ७/१०/०४

- 4 OCT 2004

प्रति,

मा. ~~प्राचार्य~~/मुख्याध्यापक,
आणे माळशेज हाय० व ज्यु० कॉलेज
मढ ता. जुन्नर जि. पुणे

विषय :- सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षी उच्च माध्यमिक इयत्ता ११ वी प्रथम वर्ष नविन/जादा/अतिरिक्त शाखा/वर्ग मंजूर करणेबाबत . . .

संदर्भ :- १) शासन पत्र क्रमांक एच-एस-सी/-१६०४/(२४/०४)/उमाशि-१ दि-२५/६/०४
२) मा. शिक्षण संचालक यांचे पत्र जा.क्र. एच-एस-सी/१०२००/०३/०४/आदेश १२ एच-एस दि. २३/२/२००४

वरील विषयाबाबत संदर्भाधिन आदेशानुसार कळविण्यांत येते की, सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात ११ वी (प्रथम वर्ष) खालील नवीन/जादा/अतिरिक्त शाखा वर्गांना विनाअनुदान तत्वावर खालील अटींच्या आधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे

मराठी माध्यम 2003-04

| इयत्ता | शाखा | | | | एकूण तुकड्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | कला | विज्ञान | वाणिज्य | संयुक्त | | |
| इयत्ता ११ वी प्रथम वर्ष | १ (प्रथम) | — | — | — | १ प्रथम | कायम विनाअनुदानीत मान्यता |
| एकूण | १ प्रथम | — | — | — | १ प्रथम | कायम विना अनुदान मान्यता |

अटी :

१. संबंधित संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे आहे. तसेच ज्या माध्यमिक शाळेला जोडून उच्च माध्यमिक शिक्षणाच्या वर्गांना परवानगी द्यावयाची आहे. अशी माध्यमिक शाळा मान्यता प्राप्त आहे.

२. ज्या उच्च माध्यमिक वर्गां शासनाची कायम विनाअनुदान तत्वावर मंजूरी देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

३. शासनाच्या पूर्वपरवानगीने निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारणे संस्थेवर बंधनकारक राहील.

४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबीत नाही.

५. ही परवानगी शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एचएससी/१०४५/४१९/२०२१/दिनांक ६.५.७५ व त्यानंतर वेळोवेळी विहित केलेल्या अटींच्या पर्ततेवर म्हणजेच सरासरी हजेरी, शाळागृहांच्या खोल्या व इतर भौतीक सुविधा, शैक्षणिक दृष्ट्या पात्रता धारक प्रशिक्षित शिक्षक शैक्षणिक साहित्य, विज्ञान साहित्य प्रयोगशाळा इत्यादींना पर्तता करण्याच्या अटीवर परवानगी देण्यात येत आहे. सदर वर्ग सुरु केला असल्यास पटसंख्या व सरासरी हजेरी कळवावी.

६. इयत्ता ११ वी चे अतिरिक्त वर्ग/तुकड्यांचे वाटप करतांना शासन पत्र, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय यांचे क्रमांक एचएससी १२००/(२१०१/००)/उमाशि-१, दिनांक २१ सप्टेंबर, २००० मध्ये नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्यांत यावी.

७. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी मिळालेली 'उच्च माध्यमिक शाळा' असा फलक शाळेने ठळक अक्षरात दर्शनी भागांत पालकांना दिसेल अशा तऱ्हेने लावावा. तसेच संस्थेने संबंधित अधिकाऱ्यांशी/शासनाशी पत्रव्यवहार करतांना "कायम विनाअनुदानित शाळा" अशा प्रकारे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.

८. शाळांतील इयत्ता ११ वी चे वर्ग माध्यमिक शाळांना जोडले असल्यास ८० विद्यार्थ्यांची एक तुकडी व वरिष्ठ महाविद्यालयांना जोडलेले असल्यास १२० विद्यार्थ्यांची एक तुकडी या सूत्रानुसार संबंधित अधिकाऱ्यांनी त्याची पुन्हा खातीरजमा करुन त्यानंतरच अतिरिक्त वर्ग/तुकडी मंजूर करावी.

९. सन २००३ पासून अतिरिक्त वर्गास/तुकडीस मान्यता दिल्यानंतर, ज्या शाळांनी अशी तुकडी सुरु केली नसेल तर त्या वर्षापुरती सदर तुकडी ग्राह्य धरण्यात येऊ नये. मात्र अशा प्रकारे अग्राह्य ठरलेली, परंतु प्रत्यक्षात मान्य असलेली तुकडी पुनर्जिवित करण्याकरिता संबंधित शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे

१०. पुढील वर्षी इ. १२ वी च्या नैसर्गिक वाढीचा वर्ग सुरु करावयाचा असल्यास शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या मार्फत प्राचार्यांनी/मुख्याध्यापकांनी विहित पद्धतीत प्रस्ताव सादर करावा. शासनाच्या परवानगीशिवाय वर्ग सुरु ठेवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्राचार्यांवर / मुख्याध्यापकांवर राहील याची नोंद घ्यावी.

स्थळप्रतिवर मा.शिऊसं यांची स्वाक्षरी असे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१ करिता

प्रत :

१. मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे - यांना संदर्भिय पत्रानुसार माहितीसाठी सविनय सादर
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे/अहमदनगर/सोलापूर/सातारा
यांना त्या माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना

कायम विनाअनुदान तत्वावर

जाक्र उमाशि-१/ग.३/जा.७ वर्ग मान्यता/माशि/ सं.५३

शिक्षण उपसंचालक,

पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय

दिनांक : ७/१०/०४

= 4 OCT 2004

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,

झोणे माध्यमिक हायस्कूल व ज्यु. कॉलेज
मढ ता. जुन्नर जि. पुणे

विषय : अनुदानित/अंशतः अनुदानित/विनाअनुदानित/ कायम विना अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेस / कनिष्ठ महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २००४-०५ करिता नविन/जादा/अतिरिक्त /शाखा तुकडया इ. ११ वी नैसर्गिक वाढ वर्ग मंजूरीबाबत. .

संदर्भ : १. शासन पत्र क्र. एचएससी- १७०३/(३१०१/ )/उमाशि-१, दि. २१.९.२०००
२. जा पत्र क्र. एचएससी/१७०३/२४६/०३/उमाशि-१, दि. १३.२.२००४
३) संबधीत शिक्षणाधिकारी मा - A.M. H.m-2004-05 दि. ७/१०/०४

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, आपल्या माध्यमिक शाळेस/उच्च माध्यमिक शाळेस/कनिष्ठ महाविद्यालयास शासन निर्णय दिनांक २१.११.२००० मधील आणि त्याशिवाय खालील अटींच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २००४-२००५ करिता कायम विना अनुदान तत्वावर खाली नमूद केलेली/केलेल्या नविन/जादा/ अतिरिक्त शाखा/तुकडी/तुकडया नैसर्गिक वाढीने इ. १२ वी साठी मंजूर करण्यात येत आहे/आहेत.

| अ. क्र. | माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव व पत्ता | माध्यम | वर्ग व शाखा | तुकडी क्रमांक | कायम विनाअनुदानित तत्वावर वर्ग मंजूरीचे वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | | ३. | ४. | ५. | ६. |
| १) | झोणे माध्यमिक हाय. व ज्यु. कॉलेज मढ जुन्नर | मराठी कला प्रथम | इ. १२ वी कला | प्रथम | २००४-०५ | कायम विनाअनुदान तत्वावर वर्ग मान्यता |

## अटी व शर्ती

१. जुलै/ऑगस्ट मधील पटपडताळणी नंतर मान्य केलेल्या पटावर वरील तुकडी मंजूर केलेली आहे.

२. मान्य पटापेक्षा कमी पट असल्यास/आढळल्यास सदर तुकडी नादेय राहील.

३. सदर तुकडीचा आदेश प्राप्त होताच तुकडी/तुकड्या सुरु असल्याचा अहवाल मुख्याध्यापकाने/प्राचार्याने शिक्षणाधिकारी/ शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे पाठवावा. अन्यथा सदर तुकडी चालू नाही असे गृहित धरुन ती अग्राह्य धरली जाईल. अशा अग्राह्य वर्ग/तुकडीस आवश्यकता भासल्यास सदर वर्ग/तुकडीस पुर्नजिवीतसाठी विहीत नमुन्यात शिक्षणाधिकारी माध्यमिक मार्फत प्रस्ताव या कार्यालयास सदर वर्ग/तुकडी सुरु केल्यानतर **एक महिन्याच्या** आत सादर करावा.

४. सदर तुकडीवर नियुक्त केलेल्या शिक्षक कर्मचा-यांची सच मान्यता आणि वेयक्तीक मान्यता विषयक प्रस्ताव आदेश मिळाल्यापासून १० दिवसांचे आत विभागीय शिक्षण उपसंचालक कळवतील त्याठिकाणी शिबिरामध्ये दाखल करणे उच्च माध्यमिक शाळा/कमवि बधनकारक राहील.

५. पुढील शैक्षणिक वर्षी सदर मंजूर तुकडी चालू राहणा या सदर वर्गाच्या तुकडीस निकषापेक्षा पट कमी झाल्यास ती तुकडी मुख्याध्यापकाने/प्राचार्यांनी तात्काळ बद झाल्याचे शिक्षणाधिकारी/ शिक्षण उपसचालक कार्यालयास कळवावे.

६. इयत्ता १२ वी चे उच्च माध्यमिकचे वर्ग माध्यमिक शाळांना जोडलेले असल्यास ८० विद्यार्थ्यांची एक तुकडी व वरिष्ठ महाविद्यालयास जोडलेले असल्यास १२० विद्यार्थ्यांची एक तुकडी समजण्यात येईल.

स्थळप्रती मा. शि. उ. सं. यांची स्वाक्षरी असे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१ करिता

Joshi/Wahile/W_jadaord